# सापळा केस

दिनांक २२/०३/२०२१

**आलोसे १. बालाजी संभाजी लटपटे, वय ५३ वर्षे, मंडळ अधिकारी, राणी सावरगाव, जि. परभणी, यांनी आरोपी क. २. गोविंद दत्तराव सानप, सरपंच, रा. वाघदरा ता. गंगाखेड, यांचे मार्फतीने १२,५००/– रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी कार्यालयास दि. २२.०३.२०२१ रोजी तक्रार दिली की, त्यांचे वाघदरा शिवारामधील त्यांचे आजोबाच्या नावाने असलेल्या जमीनीचा कोर्टाकडुन झालेल्या तडजोडीचा फेरफार त्यांचे वडीलांचे व चुलत्यांच्या नावे लावण्यासाठी बालाजी संभाजी लटपटे, मंडळ अधिकारी, राणी सावरगाव, ता.गंगाखेड, जि. परभणी, हे गोविंद दत्तराव सानप, सरपंच, रा. वाघदरा ता.गंगाखेड यांचे मार्फतीने लाचेची मागणी केली आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

त्यानुसार दि २२.०३.२०२१ रोजी लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष गंगाखेड येथे करण्यात आलेल्या कार्यवाहीत तक्रारदार यांचे वाघदरा शिवारामधील त्यांचे आजोबाच्या नावाने असलेल्या जमीनीचा कोर्टाकडुन झालेल्या तडजोडीचा फेरफार त्यांचे वडीलांचे व चुलत्यांच्या नावे लावण्यासाठी बालाजी संभाजी लटपटे, मंडळ अधिकारी, राणी सावरगाव, ता.गंगाखेड, जि. परभणी, व गोविंद दत्तराव सानप, सरपंच, रा. वाघदरा ता.गंगाखेड यांनी १५,०००/–रू लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडुन पंच क्र.१ यांचे समक्ष तडजोडीअंती १२,५००/–रूपये बालाजी संभाजी लटपटे, मंडळ अधिकारी यांचे निवासस्थान व्यंकटेश नगर गंगाखेड या निवासस्थानी गोविंद दत्तराव सानप, सरपंच, यांचे मार्फतीने स्विकारली आहे. नमुद दोन्ही आरोपींना स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.गंगाखेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत के. हुंबे, पोलीस निरीक्षक अमोल कडु, पोना/अनिल कटारे, पोना/अनिरूध्द कुलकर्णी, पोशि/सचिन धबडगे, पोह/जहागीरदार, पोह/हनुमंते, पोना/शेख मुखीद, पोशि/माणिक चट्टे, पोशि/शेख मुक्तार, मपोशि/दंडवते, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

**श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५**
**श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड– ९६६५४७९३३३**
**श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि. परभणी – ७०२१००२११०**
**श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. परभणी – ८०८७०७२९१९**

Scanned with CamScanner